
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९१ • सप्टेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक अंक-२



प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

Scanned By Camera Scanner

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक॥

**पुरवणी अंक २ – सप्टेंबर २०२३ (त्रैमासिक)**

• शके १९४५ • वर्ष : ९१ • पुरवणी अंक : २

**संपादक मंडळ**

• प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned By Camera Scanner

२५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण

- प्रा. विलास मेश्राम ---------- ११२

२६. महिला सक्षमीकरणातील अडसर – महिलांची तस्करी :

महिलांची तस्करी ( मानवी तस्करी ) ची वाढती समस्या

- प्रा. विशाखा मानकर ---------- ११६

२७. डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या गीतातील स्त्रीविषयक दृष्टीकोन

- नितीन संजय ससाणे, प्रा. डॉ. संजय महादेवराव मोहड ---------- १२२

२८ औरंगाबाद जिल्ह्यातील महिला व युवा सहकार चळवळीचा इतिहास

- डॉ. संभाजी सोपानराव दराडे ---------- १२६

२९. भारतातील महिला सक्षमीकरणात सामाजिक व आर्थिक स्थितीचे योगदान

- डॉ. एम. के. नन्नावरे ---------- १३१

३०. बालविवाहः ग्रामीण भारतातील स्त्रियांची समस्या

- प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभुराव मुंढे ---------- १३६

३१. महिला सशक्तीकरणात समान नागरी कायद्याची भूमिका

- मंगेश ते. देवढगले ---------- १३९

३२. महिला सक्षमीकरणात कायदा आणि समाजाची भुमिका

- डॉ. अस्मिता ठोंबरे ---------- १४५

३३. 'बचत गटातील महिलांचा पंचायत राज व्यवस्थेत सहभाग'

- महेंद्र देवराव भलमे, प्रा. डॉ.राजेंद्र एम. झाडे ---------- १४८

३४. 'गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीसक्षमीकरण'

- कु. उज्वला नामदेवराव जानवे, डॉ. परमानंद बावनकुळे ---------- १५१

३५. भारतातील ग्रामीण महिलांची मूलभूत समस्या

- प्रा. सौ. मेघा सौरव देसाई ---------- १५६

Scanned By Camera Scanner

# औरंगाबाद जिल्ह्यातील महिला व युवा सहकार चळवळीचा इतिहास

**डॉ. संभाजी सोपानराव दराडे**
इतिहास विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई ता.नेवसा, जि,अहमदनगर

**प्रस्तावना :**

भारताच्या सहकार चळवळीच्या इतिहासात जवळपास ११७ वर्षामध्ये महत्वपूर्ण कार्य केल्याने ही चळवळ ग्रामीण समाज व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनलेली आहे. सहकारी कार्यकर्ते, सभासद व नेते यांच्या बरोबरच या चळवळीला योग्य दिशा देण्याचे काम सहकार खात्याने केले. सुरवातीच्या कालखंडात सहकार चळवळीचा विविध क्षेत्रात उगम, विकास, विस्तार आणि प्रसाराची बिजे रुजवली गेली. या चळवळीच्या सुरवातीला निकोप वाढ झाली. सहकार क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेरणा देऊन, त्यांची सुप्त शक्ति जागृत करून, उत्साह वाढवून त्यांच्या शक्तीचा आणि निष्टेचा उपयोग सहकार चळवळीच्या विकासासाठी अधिकाऱ्यांना करावा लागला. सहकार चळवळीच्या बांधणीसाठी राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील सुपर वायझिंग युनियन्स यांच्यामार्फत सहकारी शिक्षण, प्रचार, प्रसार व विकास यावर भर देण्यात आला.[१] अशाप्रकारे औरंगाबाद जिल्यातील सहकारी संस्थाचा विस्तार झालेला दिसून येतो. आजच्या मुक्त अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीला यशस्वीरीत्या काम करावयाचे असेल तर अनुभवी कार्यकर्ते, तरुणवर्ग व महिला यांचा समावेश असणे आवश्यक आहे आणि त्यांना व सहकारी संस्थेतील सेवक वर्गाला प्रशिक्षणाद्वारे कुशल करणे गरजेचे आहे. सहकार चळवळीचे कार्य सभासद केंद्रीत व निष्ठापूर्वक असले पाहिजे व सहकारी कायद्याचा वापर सर्वांसाठी समान केला पाहिजे.

सहकार क्षेत्रामध्ये महिलांनी कार्य केल्यास एक वेगळाच इतिहास निर्माण होऊ शकतो. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये १९६० च्या आसपास म्हणजेच महाराष्ट्र स्थापनेच्या वर्षापासून सहकार चळवळीत सहभागाची सुरुवात झालेली दिसून येते. आज महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात महिलांची साक्षरता पुरुषांपेक्षा सरस ठरत असताना पुरुषप्रधान संस्कृतीने महिलांना सहकारी चळवळीपासून वंचित ठेवल्यामुळे, सहकार चळवळीच्या वाढीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. हे परिणाम लक्षात येताच सहकारी क्षेत्रातील नेते व विचारवंत यांनी महिलांना चळवळीची प्रवेशद्वारे उघडी केली. याचा परिणाम म्हणून आज महिलांच्या विविध प्रकारच्या सहकारी संस्था, व्यवसाय आणि तोही फायद्यात करताना दिसतात.

**महिला सहकार चळवळीचा इतिहास :**

औरंगाबाद शहरातील विदयूल्लता खेडकर आणि कुसुमताई जोशी या महिला कार्यकत्याच्या स्पर्धेतून इंदिरा महिला नागरी सहकारी बँकेची स्थापना सन १९७६ मध्ये झाली आणि खर्या अर्थाने औरंगाबाद जिल्ह्यात महीलाच्या सहकारी चळवळीला सुरुवात झाली. या बँकेच्या अध्यक्षपदी विघुल्लता खेडकर यांची नियुक्ती झाली. त्यापूर्वी कुसुमताई जोशींनी जमा केलेले भाग भांडवल सभासदांना परत केले आणि प्रामाणिकपणे एक उदाहरण घालून दिले. इंदिरा महिला नागरी सहकारी बँकेच्या स्थापनेपुर्वी अपवादात्मक क्वचित सहकारी संस्थावर महिला संचालक मंडळात असत. पण महिलांचेच पूर्ण संचलक मंडळ असलेल्या या बँकेच्या रूपाने प्रथमच सहकारी चळवळीत महीलेचा प्रवेश झाला. पण अयोग्य व्यवस्थापणामुळे ही बँक बंद पडली.

पुढे सहकारी कायदा १९६० मध्ये काही दुरुस्त्या करण्यात आल्या. ७३ व्या कलमाचा समावेश करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक सहकारी संस्थाच्या संचालक मंडळात महिला संचालक मंडळात महीला संचालक होणे सक्तीचे केले. त्यानुसार आता औरंगाबाद जिल्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळात महिलांचा समावेश करण्यात आला.[२] संचालक मंडळातील समवेशामुळे महिलांना सहकारी चळवळ समजू लागली आणि पुढचे पाऊल म्हणून महिलांच्या स्वतःच्या पंतसंस्था, औद्यगिक संस्था, प्रक्रिया संस्था अस्तित्वात येऊ लागल्या. आज औरंगाबाद जिल्यात महिला सहकारी संस्थांची संख्या बऱ्याच प्रमाणात दिसून येते. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहेत.

१. पतसंस्था २. औद्योगिक संस्था ३. प्रक्रिया सहकारी संस्था ४. इतर प्रकारच्या संस्था दिसून येतात. त्याप्रमाणे १९९७ मध्ये आदर्श महिला नागरी सहकारी बँकेची स्थापना सहकाररत्न



Scanned By Camera Scanner

ISSN No. 2394-5990

अंबादासराव मानकापे पाटील यांनी स्थापन केलेल्या आदर्श ग्रुपमार्फत झाली. पूर्ण संचालक मंडळ आणि ७५ टक्के महिला कर्मचारी, योग्य व्यवस्थापन यामुळे सदर बँकेचे काम व्यवस्थित चालू आहे. आदर्श ग्रुपच्या ब्रँडखाली व आदर्श महिला नागरी सहकारी बँकेच्या पुढाकाराने,

१. औरंगाबाद जिल्हा आदर्श महिला नागरी सहकारी पतसंस्था
२. औरंगाबाद जिल्हा आदर्श महिला बचतगट संस्थेची पतसंस्था

**३. महिलांचे बचत गट :**

यांची स्थापना होऊन आता त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. महिला सहकारी चळवळीला पूरक ठरणारे महिलांचे बचत गट डी.आर.डी.ए. महानगरपालिका, पंचायत समित्या, राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी बँका यांच्या प्रयत्नांनी मोठ्या प्रमाणावर महिलांचे बचत गट स्थापन होत आहेत तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण, सहकारी संस्था आणि बचत गटांच्या सहाय्याने सुरू झाले आहे.[३]

आदर्श महिला नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा सौ.सुनंदाताई पाटील असून संचालक मंडळातील बरेच संचालक महिला आणि कर्मचाऱ्यांपैकी बरेच कर्मचारी यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सहकारी व्यवस्थापनातील पदविका आणि पदव्या मिळवलेल्या आहेत. सहकारी बँक, नागरी पतसंस्था, विविध प्रकारच्या महिला सहकारी संस्थांनी, औरगाबाद जिल्यात सहकारी चळवळीने आकार घेण्यात सुरुवात केली आहे. सहकारी बँकेच्या नंतर महत्वाची संस्था म्हणजे सहकारी साखर कारखाना, कन्नड सहकारी साखर कारखाना अध्यक्षपद श्रीमती तेजस्विनी जाधव यांनी यशस्वीरीत्या भूषविले आहे.[४]

आज सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी दुध संस्था, ग्राहक सहकारी भांडारे या सारख्या महत्वाच्या संस्थावर पदाधिकारी, संचालिका व कर्मचारी म्हणून काम करतान दिसत आहेत.

**उद्दीष्टे :**

१. औरगाबाद जिल्ह्यातील महिला व युवा सहकार चळवळीचा इतिहास नव्याने तपासणे.
२. महिला व युवा सहकार चळवळीच्या कार्याचे मूल्यमापन करणे.
३. महिला व युवा सहकार चळवळीच्या कार्याचा ग्रामीण जनतेत काय परिणाम होऊ शकतो याचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

१. औरंगाबाद जिल्यातील सहकार चळवळीचा इतिहास हा संघर्षाचा इतिहास असून त्याचा सलग व परिपूर्ण अभ्यास केला आहे.
२. सुरूवातीचे सहकारी कार्यकते निश्चित ध्येयाने व निःस्वार्थ बुद्धीने कार्य करून क्षेप घेतली मात्र दुसऱ्या पिढीने योग्य कार्य न केल्याने सहकारी चळवळीला मर्यादा प्राप्त झाल्या.
३. सहकारी चळवळीने संस्थात्मक विकास घडविला, परंतु नैतिक अधःपतन कसे थांबेल याचा अभ्यास केला आहे.

**संशोधन पद्धती :**

या संशोधांनासाठी औरंगाबाद जिल्यातील सहकारी चळवळीशी निगडीत व्यक्तीच्या प्रत्यक्ष भेटी व मुलाखतीद्वारे तसेच प्रत्यक्ष निरीक्षण या पद्धतीचा अवलंब करण्यात येऊन माहिती संकलित करण्यात आली आहे.

**युवा सहकार चळवळीचा इतिहास :**

शुद्ध, निर्मल पाणी राहण्यासाठी जसा पाण्याचा प्रवाह वाहत राहणे आवश्यक आहे तसेच सहकारी चळवळ गुणात्मक व गतिमान राहण्यासाठी नवीन युवा पिढीने सहकारात प्रवेश घेणे आवश्यक आहे. राजकीय क्षेत्राला जशी युवा पिढीची आवश्यकता आहे तशीच सहकार चालवलीच्या वाढीसाठी युवकांची आवश्यकता आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील १९६० पासूनचे सहकार चळवळीच्या कार्यावर दृष्टीक्षेप टाकल्यास त्यावेळी सहकार क्षेत्रात निपुण असलेले कार्यकर्ते किवा सहकार क्षेत्रातील त्यावेळचे बुद्धिवान युवा वर्ग म्हणजे दिवंगत सहकारमंत्री विनायकरावजी पाटील, माणिकरावजी पालोदकर, बाबूरावजी काळे, बाळासाहेब पवार, काशींनाथराव कुलकर्णी इत्यादिनी अत्यंत समर्पित भावनेने सहकारात कार्य करून सहकारी चळवळ वृद्धिंगत केली. पण त्यांच्याच काळात दुसरी फळी जी निर्माण व्हायला हवी होती ती निर्माण झाली नाही. त्यामुळे औरंगाबाद जिल्यातील सहकार चळवळ घराणेशाहीत अडकली. यामुळे प्रामुख्याने काळे घराणे, पालोदकर घराणे, पाटील घराणे अर्थात असे असले तरी या घराण्यातील व्यक्ती सहकार क्षेत्रात अनुभवी व्यक्ती असल्यामुळे सहकार चळवळीवर घराणेशाहीचा विपरीत परिणाम झालेला दिसत नाही. ग्रामीण भागातील सहकार चळवळ, शहरी भागातील सहकार चळवळ यात समतोल राखून सहकारी संस्थांचे त्रिस्तरीय कार्य यशस्वीरित्या चालू राहिले.



Scanned By Camera Scanner

यामुळे दुग्ध संस्था, गृहनिर्माण संस्था, ग्राहक संस्था, जिनिंग प्रेसिंग संस्था, सुतगिरण्या अन्य पूरक जोडधंदे असणाऱ्या सहकारी संस्था उदयास आल्या.

घराणेशाहीतील कर्तबगार व्यक्तीमुळेच सहकारी क्षेत्र सुरळीत चालू होते. तरी सहकाराच्या संकल्पनेप्रमाणे ते सहकारी कार्यकर्त्याच्या बाबतीत विकेन्द्रित नव्हते. त्यामुळेच आजची सहकारी चळवळ ग्रामीण भागातून स्थलांतरित होऊन शहरी भागात स्थिरावलेली दिसते. संघ संस्था आर्थिकदृष्ट्या मजबूत पण त्यांच्याच प्राथमिक संस्था मात्र आर्थिकदृष्ट्या कमकुवत दिसतात. त्याचा परिणाम ग्रामीण भागातील सेवा सहकारी संथा, दुग्ध उत्पादक सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था व अन्य औद्योगिक संस्था मोठ्या प्रमाणावर डबघाईस आलेल्या दिसतात.[५]

सहकरबाबतचा कुठलाही पुर्वदूषित दृष्टीकोन नसतो. कोऱ्या पाटीवर जसे आपल्याला हवे तसेच युवकांच्या या कोऱ्या मनावर सहकाराची विधायक बाजू मांडता येते. आजचा युवक हा गरुड्झेपी आहे. हवे ते बदल घडवून आणण्याची त्यांच्यात क्षमता आहे. कल्पकता आहे परंतु त्याला देशाच्या आर्थिक विकासासाठी स्वीकारलेल्या लोकशाही तत्वावर आधारित असलेल्या सहकार चळवळीच्या माध्यमपासून दूर ठेवण्यात आलेले आहे. आजच्या युवकांत सहकारी चळवळीबद्दल आकर्षण निर्माण होत नाही. सहकारी चळवळीतील राजकारण, गटबाजी स्वार्थ, भष्टाचार यांचेच दर्शन त्याला सतत घडत असते. राजकारण आणी भ्रष्टाचाराने पोखरलेली सहकारी चळवळ अनेक सहकारी संस्थाची बिलिनीकरणाकडे वाटचाल होत असलेली सहकारी चळवळ योग्य मार्गदर्शना अभावी निस्तेज होत चाललेली सहकार युवकांना आकर्षित कर शकेल का ? हा खरा प्रश्न आहे तेव्हा युवकांच्या ताब्यात सहकारी चळवळ देण्याचे आवाहन करण्यास फार उशीर झाला असेच म्हणावे लागेल.[६]

आजच्या युवकांनी आपले योगदान सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी द्यावयाचे ठरविले तर विविध मार्गांनी ते देता येईल असे योगदान प्रत्यक्ष आपल्या सहकारी संस्था स्थापन करून सध्या अस्तित्वात असणाऱ्या सहकारी संस्थातील कारभार सुधारून त्यांना विविध कल्पना सुचवून देता येतील. श्री बापूसाहेब पुजारी म्हणतात, स्वायत्त सहकारी चळवळीसाठी जनआंदोलन हवे. तसेच सहकारी चळवळीसाठी आचारसंहितेची गरज आहे. आचारसंहितेमुळे मंत्री, खासदार, आमदार यांना सहकार क्षेत्रापासून दूर ठेवता येईल, तसेच सहकारी कार्यकर्त्यांना राजकारणापासून दूर ठेवता येईल.[७] यासर्व बाबी लक्षात घेतल्या तर स्पष्ट दिसून येते की, युवावर्गाने या सहकार चळवळीमध्ये येण्याची खरी गरज निर्माण झाली आहे. सहकारी क्षेत्रात संस्था स्थापनेसाठी सहकारी खाते व शासन यांची या संस्था नोंदणीबाबतची धोरणे प्रोत्साहन व प्राधान्य देणारी पाहिजे.

आपली राज्ययंत्रणा ही जशी लोकशाही तत्वावर आधारित आहे तशीच सहकार चळवळ ही लोकशाही तत्वावर आधारित आहे. त्यामुळे सभा, निवडणुका, प्रतिनिधी मतदार, मतदान याबाबींना सहकार क्षेत्रात महत्व आहे त्यामुळे विद्यालयीन व महाविद्यालयीन युवकांचे रूपांतर सुजाऩ नागरिकांत होऊन त्याचा फायदा देशाला व सहकारी चळवळीला होऊ शकतो.

आज विद्यालये व महाविद्यालय यांच्यामधून ग्राहक भांडारांचे प्रमाण घटले आहे. त्याऐवजी युवकांमध्ये राजकरणाबद्दल आकर्षण वाढत आहे. विधायक कार्य करून समाजातील गरजू लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या राजकीय सत्तेद्वारे सोडविण्यासाठी जो विधायक दृष्टीकोन लागतो तो आजच्या तरुणांमध्ये आढळत नाही. नगरसेवक, सरपंच, आमदार, खासदार, मंत्री विविध मंडळाचे अध्यक्ष होऊनच समाजसेवा करता येते अशी त्यांची धारणा झाल्याची दिसते. कारण सत्ता मिळाली की संपत्ति मिळते हे गणित झालेले आहे. आज काही अंशी ग्रामीण व शहरी भागातून युवा वर्ग सहकारी क्षेत्रात आढळतो आहे पण तो पक्षात राजकरणात अडकलेला दिसतो. सहकारी क्षेत्रात राजकारण नको म्हणत असतानाच विविध राजकीय पक्ष, सहकारी संस्था, बचत गट हिरीरीने स्थापन करीत असताना दिसतात. त्यामुळेच औरंगाबाद जिल्ह्यातील विद्यार्थी ग्राहक भांडारांची संख्या नगण्य दिसते.

**विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडारे :**

सहकारी क्षेत्रात युवक युवतींनी सहभागी होणे आजच्या घडीला केवळ महत्वाचेच नव्हे तर त्यातून अनेक गोष्टी साध्य होणार आहेत. विद्यार्थी ग्राहक सहकारी भंडार स्थापन करणे फार सोपे आहे. उदा. एका कॉलेजात एक हजार विद्यार्थी आहेत. प्रत्येकी शंभर रुपये भाग भांडवल म्हणून त्यांनी या विद्यार्थी ग्राहक भंडारत गुंतविल्यास ती रक्कम रुपये एक लाख होईल. तेवढीच आर्थिक मदत भागभांडवलात हिस्सा म्हणून सरकारमार्फत उपलब्ध होईल असे एकूण दोन लाख जमा झाल्यास तेवढेच कर्ज सहकारी बंकेकडून मिळू शकेल. म्हणजेच विद्यार्थ्याने प्रत्येकी शंभर रुपये जमा केले तर विद्यार्थी ग्राहक भांडाराच्या माध्यमातून चार लाख एवढी रक्कम त्यांच्याजवळ जमा होईल सहकारी खात्याकडे प्रस्ताव दाखल करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी ग्राहक सहकारी भंडारची नोंदणी करता येईल. या भंडाराद्वारे पुढील कार्य करता येईल.

ISSN No. 2394-5990

१. विद्यार्थ्यांना लागणारी पुस्तके, नोटबूक, प्रात्यक्षिकांचे सामान व अन्य स्टेशनरी ठोक स्वरूपात खरेदी करून ना नफा ना तोटा या पद्धतीवर विद्यार्थ्यांना पुरवठा करता येईल.

२. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, वसतिगृहाबाहेर राहणार्या विद्यार्थ्यांना बनियन्स, टॉवेल, साबण, तेल, परफुम्स, सेविंग मटेरियल्स इ. बाजारपेठेपेक्षा कमी भावात पुरविता येईल.

३. विद्यार्थ्याव्यतिरिक्त विद्यालये व महाविद्यालये यामधील अध्यापक वर्ग यांना आवश्यक असणाऱ्या दैनंदिन गरजांच्या वस्तु ग्राहक भांडाराच्या माध्यमातून खरेदी करता येईल.

४. त्या संस्थामध्ये मेस चालवली जात असेल तर त्याला लागणारा भाजीपाला, धान्य, मसाला इत्यादी या विद्यार्थी ग्राहक भांडाराच्या माध्यमातून पुरविता येईल.[८]

विद्यालये व महाविद्यालये यामधून वरीलप्रमाणे विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडारे सुरू केल्यास पुढील फायदे मिळू शकतात.

१. विद्यार्थ्यांच्या आर्थिक गरजा पुरविल्या जाऊन त्यांना आवश्यक असलेल्या वस्तु वेळेवर व माफक दरात मिळू शकतील.

२. त्या संस्थेमधील अध्यापक वर्ग व कर्मचारी वर्ग यांना लागणार्या दैनंदिन गरजेच्या वस्तु योग्य भावात व निर्मल स्वरुपात मिळू शकतील.

३. सदर ग्राहक भंडारांचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांमार्फत केले जात असल्यामुळे व ते त्यांच्यातून निवडून आलेल्या संचालकामार्फत केले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना निवडणूक शास्त्राचे व सभा शास्त्राचे सखोल ज्ञान मिळू शकेल.

४. विद्यार्थी हे त्या ग्राहक भांडाराचा सभासद असतील त्यांच्यामधून संचालक मंडळाची निवड केली जाईल. भांडाराचा अध्यक्ष मुख्याध्यापक किवा प्राचार्य असतील व संचालक मंडळावर एखादा प्राध्यापक मार्गदर्शनासाठी घेतला जाईल. यामुळे विद्यार्थ्यांना सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनातील घटक व त्यांची कार्य याबाबतची महिली मिळेल.

५. भांडारचे जमा खर्च लिहिणे, संबंधितांशी पत्रव्यवहार करणे, वस्तूची खरेदी करणे, त्यांची विक्री करणे इत्यादि बाबी विद्यार्थ्यांनाच करावे लागत असल्यामुळे त्यांना संस्थेचे रेकॉर्ड, संस्थेची कार्यपद्धती, खरेदी विक्री ज्ञान, ना नफा-ना तोटा इत्यादिबाबतची माहिती विद्यार्थीदशेतच होईल व प्रत्येक व्यवहारांचा उपयोग त्यांना होईल तसेच सहकारी संस्थांनासुद्धा या बाबतची पुरेपूर माहिती असणारा युवा वर्ग उपलब्ध असेल.[९]

अशा पद्धतीने आजचा युवक सहकारी चळवळीच्या विकासासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या योगदान देऊ शकेल. त्यांच्या योगदानामुळे त्यांच्या आर्थिक विकासाबरोबरच राष्ट्र व समाज यांची सेवा करण्याची संधी त्याला प्राप्त होईल. देशातील प्रचंड युवा शक्तीला विधायक कार्याकडे वळविता येईल. या शिवाय आजचा युवक जो वेगवेगळ्या राजकीय पक्षात विभागला गेला तो एकसंध होईल. अशा एकसंध झालेल्या युवकामुळे आपोआपच जातीभेतांच्या भिंती पडून राष्ट्रीय एकात्मता खर्या अर्थाने साध्य होईल.

**आजच्या युवकांसाठी नाविन्यपूर्ण सहकारी संस्था :**

१. विविध अभ्यासक्रमाचे सहकारी तत्वावर कोचिंग क्लासेस सुरू करणे.

२. विविध तांत्रिक शिक्षणाच्या शाळा वर्कशॉप सहकारी तत्वावर काढणे.

३. सहकारी तत्वावर मेडिकल स्टोअर स्थापन करणे.

४. वैद्यकीय मदतीसाठी वैद्यकीय शिक्षणक्रम उतीर्ण विद्यार्थ्यांनी सेवा सहकारी संस्था काढून शासनाच्या वैद्यकीय सवलतिच्या योजनांचा रुग्णांना लाभ मिळवून देणे.

५. सहकार पद्धतीने दूध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, कुक्कुटपालन व्यवसाय, शेळी मेंढी पालन व्यवसाय यासारखे पूरक व जोडधंदे सुरू करणे.

६. सहकारी तत्वावर आधारित छापखाने काढून वृत्तपत्र चालविणे, विविध साहित्याची निर्मिती करणे.

७. सहकारी पद्धतीने ब्युटीपार्लर, शिवणक्लास चालविणे.

८. सेवा संस्था स्थापन करून ग्राहकांची विद्युत बिले, टेलिफोन बिले, पाणीपट्टी बिले इत्यादींचा भरणा करणे.

९. सहकारी पद्धतीवर दवाखाने चालविणे.[१०]

अशा पद्धतीने आजचा युवक सहकारी चळवळीच्या माध्यमातून विविध संस्था स्थापन करू शकतात. त्यातून त्यांचा आर्थिक विकास तर होईलच, त्याचबरोबर जनसामान्यांना सेवा दिल्याचे श्रेय त्यांना मिळेल आणि त्यांना स्वाभिमानी जीवन जगता येईल. भांडवलाचा प्रश्न सहकारात आपोआप सुटतो. थोडक्यात युवकांनी मनात आणले तर सहकारी चळवळीसाठी ते भरघोस योगदान देऊ शकतील.



Scanned By Camera Scanner

**निष्कर्ष :**

१. शहरी व ग्रामीण भागात या चळवळीने समाजात जागृती झाली.

२. ग्रामीण भागातील या चळवळीमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले.

३. आजही ज्या भागाचा विकास झाला नाही तेथे महिला व युवा सहकार चळवळ सुरू केल्यास प्रगतीला चालना मिळेल.

४. समाजाचे आर्थिक व सामाजिक राजकारण बदलून समाज प्रगल्भ होऊ शकले.

**समारोप :**

औरंगाबाद जिल्यातील सहकारी तत्वावर चालणार्या संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या अशा अनेक प्रकारच्या जसे सहकारी शेती पतपुरवठा संस्था, बिगर शेती पतपुरवठा संस्था, पणन सहकारी संस्था, उत्पादन सहकारी संस्था, पाणीवाटप सहकारी संस्था, सामाजिक सहकारी संस्था इत्यादी संस्थांचा अभ्यास करण्याबरोबरच महिला सहकारी व युवा सहकार चळवळीने केलेल्या योगदांनाचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. या चळवळीने ग्रामीण भागात रोजगाराची निर्मिती होऊ शकते. सहकार चळवळ प्रगल्भ होईल जिल्यातील युवा व महिला वर्गाचा अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे. यामुळे ग्रामीण भागात आर्थिक सबलीकरण होऊ शकते.

**संदर्भ व ग्रंथ सूची :**


१. पाटील उत्तम (१९८८), स्मृतिग्रंथ, भारतीय सहकारी चळवळ. अमृत महोत्सव, प्रकाशन बाळासाहेब पवार, अध्यक्ष दी महाराष्ट्र को ओप्रटिव्ह मार्केटिंग लि, मुंबई पृ.२८.

२. तुपे सु,दा. (१९९४), मराठवाड्याचा आर्थिक विकास व समस्या, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, पृ.२७.

३. मुलाखत, जोशी ललित दि.९/५/२०१४.

४. कित्ता, मुलाखत.

५. कित्ता, मुलाखत.

६. जोशी ललित (२०१२), युवा सहकार, प्रकाशन सौ,मालती ल.जोशी, सहकार ज्ञानवृद्धी मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद पृ.५

७. मुलाखत, ढवळे एकनाथ दाजीबा, उपप्राचार्य रामचंद्र पाटील नागदकर सहकार शिक्षण व प्रशिक्षण, औरंगाबाद.

८. जोशी ललित (२०१३), सहकार तथ्य आणि पथ्य, लेखसंग्रह भाग २, प्रकाशक सौ,जोशी मालती ल., सहकार ज्ञानवृद्धी मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद पृ.२६

९. कित्ता, पृ.२७

१०. मुलाखत, देशमुख एस. एस., जिल्हा सहकार विकास अधिकारी, औरंगाबाद जिल्हा सहकारी बोर्ड लि, औरंगाबाद.




Scanned By Camera Scanner